**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण**
Maharashtra Housing & Area Development Authority
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com

जावक क्रमांक — ९५७/७ दिनांक :- २७ फेब्रुवारी, २०२३

प्रसिद्धीपत्रक

# ज्ञानसमाज साकारण्यासाठी मराठी ज्ञानभाषा होणे गरजेचे - प्रा. प्रकाश आल्मेडा

म्हाडा मुख्यालयात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'प्रशासनात मराठीचा परिणामकारक वापर' विषयावर व्याख्यान उत्साहात

मुंबई, दि. २७ फेब्रुवारी, २०२३ :- लोककल्याणकारी राज्यव्यवस्थेत सर्वसमावेशक समाज घडविण्यासाठी भाषा महत्त्वाची आहे. ज्ञान संपन्न समाज साकारण्यासाठी मराठी ज्ञानभाषा होणे गरजेचे आहे. मराठी भाषेचा प्रभावीपणे वापर केल्यास प्रशासन अधिक गतिमान होण्यास मदत होईल. प्रशासनात मराठीच्या प्रभावी वापरासाठी शब्दकोश, शास्त्रीय व तांत्रिक परिभाषा कोश यांचा आवर्जून उपयोग करावा, असे प्रतिपादन प्रा. प्रकाश आल्मेडा यांनी आज केले.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात ज्येष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांची जयंती अर्थात मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून म्हाडातील अधिकारी-कर्मचारी यांच्यासाठी 'प्रशासनात मराठीचा परिणामकारक वापर' या विषयावर प्रा. आल्मेडा यांचे आज व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या प्रसंगी प्रा. आल्मेडा बोलत होते.

यावेळी 'म्हाडा'चे मुख्य अभियंता श्री. धीरजकुमार पंदीरकर, 'म्हाडा'चे सचिव श्री. राजकुमार सागर, म्हाडा कर्मचारी संघटनेचे प्रधान कार्यवाह श्री. मोहनराव कोळी व्यासपीठावर उपस्थित होते.

प्रा. आल्मेडा म्हणाले की, प्रशासनातील मराठी अधिक सुलभ, समजण्यास सोपी व मुद्देसूद असली पाहिजे. प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी परिभाषा रुजविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. प्रशासनात काम करताना बोली भाषेतील शब्द टाळावेत, शिष्टताही प्रशासकीय भाषेच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. विचारांची भाषा मराठी असेल तर संप्रेषणाची ज्ञानभाषा मराठी होईल, असेही प्रा. आल्मेडा यांनी सांगितले. मसुदा लेखन, टिपणी लेखन, भाषांतर, अचूक शब्दप्रयोग या विषयांबाबतही प्रा. आल्मेडा यांनी माहिती दिली.

'म्हाडा'चे सचिव श्री. राजकुमार सागर म्हणाले की, मराठी भाषेचा प्रसार, प्रचार व्हावा, संवर्धन व्हावे या उद्देशाने या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले असून दैनंदिन प्रशासकीय कामकाजात सहज, सोप्या, मुद्देसूद मराठीचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन श्री. सागर यांनी केले.

'म्हाडा'चे जनसंपर्क अधिकारी तथा मराठी भाषा अधिकारी श्री. हेमंत पाटील यांनी प्रास्ताविक केले व आभार मानले.

यावेळी 'म्हाडा'तील अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

(हेमंत पाटील)
जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण








म्हाडा
MHADA
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा)